-: ई-निविदा सुचना :-

(पहिली वेळ)

ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया

निविदा सूचना क्रमांक:- जिपगों/साप्रवि/पंचा/योजना/LED/निविदा/१३०३/२०१९-२०२० दिनांक :२१/१२/२०१९

LED प्रकारचे सौर पथदिप संच (LED Soler Street Light) साहित्याचा पुरवठा करणेबाबत

जाहीर ई-निविदा

ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्यामार्फत अपारंपारिक ऊर्जा विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०१९-२० या वित्तीय वर्षात जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दित १०० टक्के अनुदानावर LED प्रकारचे सौर पथदिप संच/संयंत्र पुरवठा करण्यासाठी उत्पादक/सिस्टिम इंटिग्रेटर किंवा कंपनी/कंपनीचे महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांचे कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या पुरवठाधारकास दर निश्चीत करणेकरीता जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

कोरे निविदा प्रपत्र हे महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करता येतील. निविदा अर्जाची किंमत रु. १०००/- (एक हजार रुपये फक्त) (ना-परतावा) ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. निविदेबाबत अटी व शर्ती किंवा इतर सुचना http://www.mahatenders.gov.in व www.zpgondia.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३०.१२.२०१९ रोजी सकाळी १०:०० वाजता पासुन उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

कोणतीही पुर्वसुचना न देता संपुर्ण निविदा प्रक्रीया रद्द करण्याचा किंवा निविदेमध्ये बदल करण्याचा, अटि व शर्तींची वाढ करणे किंवा शिथील करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे इत्यादी तसेच निविदेबाबतचे संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी राखुन ठेवले आहेत.

स्वा/-
(न. का. भांडारकर)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.)
जिल्हा परिषद, गोंदिया

स्वा/-
(डॉ.राजा दयानिधी) भाप्रसे.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

-: निविदेबाबतचे वेळापत्रक :-

निविदेबाबतचा महत्वाचा घटनाक्रम खालील वेळापत्रकानुसार पुर्ण करण्यात येईल.

अ.क्र.	घटनाक्रम तपशील	दिनांक व वेळ
१	संकेतस्थळावर निविदा प्रकाशित करणे	३०/१२/२०१९ सकाळी १०.०० पासुन
२	संकेतस्थळावरुन निविदा प्राप्त करणे (Download)	३०/१२/२०१९ सकाळी १०.३० पासुन ते ०६/०१/२०२० सायं. १६.०० वाजेपर्यंत
३	संकेतस्थळावर निविदा सादर करणे (Upload)	३०/१२/२०१९ सकाळी १०.३० पासुन ते ०६/०१/२०२० सायं. १६.०० वाजेपर्यंत
४	संकेतस्थळावरुन प्राप्त निविदा उघडणे	०७/०१/२०२० दुपारी १६.०० वाजता (शक्यतो)

-: संपर्काकरीता पत्ता :-

ग्रामपंचायत विभाग,

जिल्हा परिषद गोंदिया

दूरध्वनी क्रमांकः 07182-236672

इ मेलः dyceovp_zpgondia@rediffmail.com

जिल्हा परिषद, गोंदिया

ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्यामार्फत अपारंपारिक ऊर्जा विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०१९-२० या वित्तीय वर्षात जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दित LED प्रकारचे सौर पथदिप संच/संयंत्र (LED Soler Street Light) साहित्याचा पुरवठा करणेबाबत

-: लिफाफा क्रमांक- अ:-

(तांत्रिक लिफाफा)

१	निविदा भरणाऱ्यांचे संपूर्ण नाव व पत्ता	
२	फोन व मोबाईल नंबर	
३	ई-मेल	
४	ई-निविदा विक्री किंमत	रक्कम- रुपये १०००/-
		ऑनलाईन पेमेंट पावती क्र.
		दिनांक:-
		राष्ट्रीयकृत बँकेचे नाव:-
५	बयाणा रक्कम	रक्कम- रुपये ५०००/-
		ऑनलाईन पेमेंट पावती क्र.
		दिनांक:-
		राष्ट्रीयकृत बँकेचे नाव:-

प्रमाणित करण्यात येते कि, वित्तीय वर्ष सन २०१९-२० मधील प्रथम सत्रामध्ये (ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद गोंदिया) कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दित LED प्रकारचे सौर पथदिप संच/संयंत्र साहित्याचा पुरवठा करणेसाठी ई-निविदा फॉर्म मधील अनु क्रमांक १ ते ५३ अटी व शर्ती मी/ आम्ही वाचल्या असून त्या मला/ आम्हाला मान्य आहेत.

निविदाधारकाचे सही व शिक्का:-

दिनांक :-

निविदाधारकाचे नाव:-

-: ई निविदा :-

सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्यामार्फत अपारंपारिक ऊर्जा विकास कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दित LED प्रकारचे सौर पथदिप संच/संयंत्र (LED Soler Street Light) साहित्याचा पुरवठा करणेबाबत दर निश्चीत करण्याकरीता **Annexure "B"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे ई-निविदा मागवित आहेत.

१. उत्पादक, सिस्टीम इंटिग्रेटर कंपनी/पुरवठादार कंपनीचे महाऊर्जा कार्यालयाकडे नोंदणीकृत डिलर्स यांनी निविदा पत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर सादर करणे आवश्यक आहे. निविदा संकेतस्थळावर नमुद वेळापत्रकानुसार उपलब्ध राहतील.

२. निविदा धारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा Upload करणे संदर्भात अडचणी असल्यास त्यांनी सदर वेबसाईट वरील फोन नंबर वर संपर्क साधावा. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रक्कम व निविदा फॉर्मचे शुल्क मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गोंदिया, खाते क्रमांक ३४०२७५७४७४५, IFSC क्रमांक SBIN००००३७६ या खात्यात ऑनलाईन प्रक्रियेणे भरणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत निविदाधारकांना सहभागी होता येणार नाही.

३. इतर सुचना, जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दित LED प्रकारचे सौर पथदिप संच आस्थापित करण्याचे निकष, बयाणा रक्कम, इत्यादी बाबतची माहिती, अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पाहवयास मिळतील.

४. स्वतंत्र्य ई-निविदा अर्ज भरणे तसेच अमानत रक्कम भरणा करणे अनिवार्य राहील त्याशिवाय निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही.

५. सदर निविदा मंजूर करणे त्यामध्ये अटी व शर्तीची वाढ करणे किंवा शिथील करणे व निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रियेत बदल करणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करणे व इतर बाबतचे संपूर्ण निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोदिया यांनी राखून ठेवले आहेत.

स्वा/-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद गोंदिया

-: अटी व शर्ती :-

१. उत्पादक कंपनी/पुरवठादार कंपनीचे नोंदणीकृत डिलर्स यांनी निविदा पत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर सादर करणे आवश्यक आहे.

२. निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा Upload करणे संदर्भात अडचणी असल्यास त्यांनी सदर वेबसाईट वरील फोन नंबर वर संपर्क साधावा. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रक्कम व निविदा फॉर्मचे शुल्क मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गोंदिया, खाते क्रमांक ३४०२७५७४७४५, IFSC क्रमांक SBIN००००३७६ या खात्यात ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत निविदाधारकांना सहभागी होता येणार नाही.

३. सदर निविदा मंजूर करणे त्यामध्ये अटी व शर्तीची वाढ करणे किंवा शिथील करणे व निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रियेत बदल करणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करणे व इतर बाबतचे संपूर्ण निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांनी राखून ठेवले आहेत.

४. ई-निविदा पद्धत ही दोन लिफाफे पद्धतीची असल्याने बयाणा रक्कमेचे Online Payment केल्यानंतर लिफाफा क्रमांक-**'अ'(तांत्रिक लिफाफा)** या मध्ये मागणी केलेली आवश्यक असलेली कागदपत्र स्कॅन करुन http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावीत. लिफाफा क्रमाक **'ब' (व्यापारी लिफाफा)** या मध्ये फक्त ऑनलाईन दरपत्रक भरण्यात यावी.

५. ई-निविदा विक्री किंमत रक्कम रु. १०००/- (अक्षरी- रु. एक हजार फक्त) (ना-परतावा) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गोंदिया, खाते क्रमांक ३४०२७५७४७४५, IFSC क्रमांक SBIN००००३७६ या नावे Online Payment व्दारे भरणा करावी. व भरणा केल्याची पावती/ चालान स्कॅन करुन अपलोड केल्यानंतरच ई-निविदेची कार्यवाही करावी लागेल.

६. प्राप्त ई-निविदा उपस्थित निविदा धारकांसमक्ष किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी सक्षम दिलेल्या वेळापत्रकानुसार लिफाफा क्रमांक **'अ' (तांत्रिक लिफाफा)** उघडण्याची कार्यवाही करण्यात येईल. ज्या निविदाधारकांनी निविदा अर्जात मागणी केलेल्या दस्ताऐवज बरोबर असतील त्या निविदाधारकांचा व्यापारी लिफाफा **(लिफाफा क्र. 'ब')** शक्य तो त्याच दिवशी किंवा वेळेवर तारीख व वेळ निविदाधारकांना कळविण्यात येईल. काही अपरिहार्य कारणामुळे वरिल दिनांकास निविदा उघडणे शक्य न झाल्यास तशी माहिती सुचना फलकावर लावण्यात येईल.

७. निविदा उघडतांना प्रथम लिफाफा क्रमांक **'अ' (तांत्रिक लिफाफा)** उघडण्यात येऊन त्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची व अटी/ शर्तीची पुर्तता केली असल्याची खातरजमा करण्यात येईल. तांत्रीक दृष्टया अटी व शर्तीचे पूर्तता करणाऱ्या पुरवठाधारकाचा लिफाफा **'ब' (व्यापारी लिफाफा)** ठरवलेल्या दिवशी उघडण्यात येईल. लिफाफा क्र. **'अ'** मधील आवश्यक त्या सर्व कागदपत्राची / अटी व शर्तीची पुर्तता न करणाऱ्या निविदा धारकांचे लिफाफा क्रमांक **'ब' (व्यापारी लिफाफा)** उघडण्यात येणार नाही व त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.

८. ई-निविदेपोटी बयाणा रक्कम रु. ५०००/- (अक्षरी- रु. पाच हजार फक्त) प्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गोंदिया, खाते क्रमांक ३४०२७५७४७४५, IFSC क्रमांक SBIN००००३७६ या नावे ऑनलाईन पेमेंट व्दारे जमा करावी लागेल. त्याशिवाय त्यांची ई-निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

९. अत्यावश्यक कागदपत्रे (तांत्रिक लिफाफा) :-

सदर ई-निविदामध्ये खालील नमुद केल्याप्रमाणे (सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले कागदपत्रे लिफाफा क्रमांक **'अ' (तांत्रिक लिफाफा)** सोबत सादर करणे आवश्यक आहे.

१. तांत्रिक निविदा फॉर्म (सही व शिक्यासह)
२. EMD व निविदा अर्जाची फि Online Payment व्दारे भरल्याची पावती.
३. सुविधा पुरविणाऱ्या उत्पादक/सिस्टिम इंटिग्रेटर किंवा कंपनीचे महाऊर्जाकडे नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र तसेच नोंदणीकृत डिलर्स असल्याचे प्रमाणपत्र. (उदा. SSI नोंदणी / मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८)
४. LED प्रकारचे सौर पथदिप संच/संयत्र पुरवठा/आस्थापित करण्यासंबंधी डिलरशिप बाबत कंपनीचे प्रमाणपत्र (LED Street Light Transplanter Dealarship)
५. G. S. T. नोंदणी प्रमाणपत्र
६. G. S. T. कर निपटारा प्रमाणपत्र नोव्हेंबर-२०१९ अखेरचे अथवा निविदेच्या दिनांकापर्यंत अद्यावत.
७. पॅन कार्ड प्रत
८. सन २०१८-१९ अखरेचे आयकर विवरणपत्र.
९. बयाणा रक्कमेची ऑनलाईन पेमेंट पावती.
१०. जर निविदा धारक भागीदारी संस्था किंवा कंपणी किंवा सहकारी संस्था असेल तर त्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र/ भागीदारी करार/ संस्थेच्या घटनेची प्रत जोडणे आवश्यक आहे. केवळ या निविदेसाठी संयुक्त भागीदारी (Joint Venture) केल्यास सदर निविदा अमान्य करण्यात येईल.
११. निविदा धारकाने रु. १००/- च्या न्यायालयीन मुद्रांकावर सदर संस्था/ निविदाधारक केंद्रशासन अथवा राज्यशासन यांचे कडून कधीही काळया यादीत टाकण्यात आली नाही. तसेच सदर संस्था/ निविदाधारक यांचेवर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.
१२. जे निविदा धारक व्यापारी संस्था असतील त्यांनी संबधित उत्पादकाचे प्राधिकार पत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.
१३. LED प्रकारचे सौर पथदिप संच/संयत्र निर्मीत कंपनी भारतीय असणे अनिवार्य आहे. तसेच निर्मीत कंपनीजवळ अधिकृत भारतीय उत्पादन परवाना असणे आवश्यक आहे. (Manufacturer Should have authoried munafacturing Licence of India)
१४. मागील ३ वर्षाचे ताळेबंद (Balance sheet) जोडणे आवश्यक आहे. (टेंडर धारकाची वार्षिक उलाढाल ही २५ लक्ष च्या वर असावी)

१०. ई निविदेतील लिफाफा क्र. **'ब' (व्यापारी लिफाफा)** उघडल्यानंतर न्युनतम दर असलेल्या निविदाधारकास अखेरच्या क्षणी माघार घेता येणार नाही.

११. ज्या निविदा धारकाची ई-निविदा मंजूर होईल त्याचे कडून नियमानुसार सुरक्षा अनामत रक्कम जमा केल्यानंतरच करारनामा करुन पुरवठा आदेश देण्यात येईल.

१२. बयाणा रक्कम/ सुरक्षित ठेव रक्कम यावर कुठल्याही प्रकारे व्याज मिळणार नाही. तसेच देयकाची रक्कम अदा करण्यात तरतूदी अभावी अथवा अन्य कारणामुळे विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

१३. ज्यांची निविदा मंजुर केली जाईल त्यांना ५ वर्ष पर्यंत Comprehensive Maintenance Contract (CMC) बंधनकारक करुन प्रत्यक्ष किंमतीच्या १०% रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरेंटी सुरक्षा ठेव म्हणून जमा करावी

लागेल. तसे न केल्यास व करारनामा करुन न दिल्यास किंवा असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१४. पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा करण्यासाठी कोणत्याही प्रकारे अग्रिम रक्कम मिळणार नाही.

१५. ई-निविदाधारकास शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे रु ५००/- च्या न्यायालयीन मुद्रांकावर करानामा करुन द्यावा लागेल. त्याचा पूर्ण खर्च पुरवठाधारकाने करावयाचा आहे. करारनामा लिहून दिल्यानंतरही पुरवठाधारकाकडुन अटी व शर्तीच्या बाबतीत कसुर अथवा हयगय झाल्यास व त्यायोगे आर्थिक हानी कार्यालयास सोसावी लागल्यास सुरक्षा ठेव जप्त करण्याची नुकसान भरपाई करण्याची काळयादीत समाविष्ट करण्याची कारवाई याबाबतचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी राखुन ठेवले आहे.

१६. LED प्रकारचे सौर पथदिवे संच/संयत्राचे दर प्रति नग नमुद करावेत. LED प्रकारचे सौर पथदिवे संच/संयत्राचे दर सर्व खर्चासह (हमाली, वाहतुक, जकात, टोल व इतर अनुषंगिक खर्च) व करासह या कार्यालयांच्या अधिनस्त असलेल्या गटापर्यत (गट ज्यागावात असेल त्या गावा पर्यत पोहच करुन आस्थापित करावे लागेल.) मालाची चढाई उतराई आस्थापित करण्यासह पोहच असावेत.

१७. **१ ते १०० नग LED प्रकारचे सौर पथदिवे संच/संयत्रचा पुरवठा करण्याची क्षमता असने आवश्यक आहे.**

१८. संयंत्राचा पुरवठा करण्याच्या संख्येत कमी जास्त करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांच्या कडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

१९. निविदेत नमुद केलेल्या सर्व बाबींसाठी दर नमुद करणे आवश्यक आहे एखादया बाबीसाठी दर नमुद न केल्यास अथवा दिलेल्या बाबीं व्यतिरीक्त बाबींचे दर नमुद केल्यास निविदा परिपुर्ण नसल्याचे मानुन सदर निविदा अपात्र करण्यात येईल.

२०. ज्यांनी ई-निविदा भरली आहे, त्यांनाच काम पुर्ण करावे लागेल. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत दुय्यम यंत्रणा किंवा ठेकेदार नेमु नयेत.

२१. निविदेतील साहित्याचे / वस्तुचे दर प्रचलित बाजार भावाचे दर विचारात घेवुन आवश्यकतेनुसार वाटाघाटी करण्यात येऊन अंतिम करण्यात येतील. शिवाय एकापेक्षा जास्त निविदाधारकांना दर/काम विभागुन देण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांनी राखुन ठेवलेले आहे.

२२. देयकातुन नियमानुसार आयकर व अन्य अनुषंगीक कराची कपात करण्यात येईल.

२३. महाऊर्जाकडे नोंदणीकृत पुरवठाधारकास पुरवठा आदेश दिल्यानंतरच वस्तूचा/संयत्राचा पुरवठा आदेशानुसार करावा लागेल. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

२४. निवेदेत दिलेल्या विवरणानुसार व नमुन्याप्रमाणे पुरवठा करणे बंधनकारक राहील.

२५. पुरवठादारने पुरवठा करतांना काही अपरिहार्य तांत्रिक अडचणीमुळे पुरवठया विलंब होण्याची शक्यता असल्यास त्यांनी लेखी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना योग्य समर्थनासह आगावू कळविणे आवश्यक राहील. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचा निर्णय पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

२६. निविदे मध्ये पूरवठा करावयाच्या वस्तूचे/साहीत्याचे परिमाण अंदाजे आहेत. मात्र पुरवठयाच्या परिमाणात कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. परिमाणाची कमी किंवा जास्त आवश्यकता वाटल्यास निवीदेतील दराप्रमाणेच पुरवठा करण्यास पुरवठादारास बंधनकार राहील.

२७. साहीत्याचा पुरवठा मंजूर केलेल्या नमुन्या प्रमाणे नसल्यास अशा वस्तू स्विकारण्यात येणार नाही. या वस्तू स्वत:च्या खर्चाने ताबडतोब बदलून देण्याची जबाबदारी पुरवठयाधारकाची राहील याबाबत येणाऱ्या खर्चास व नैमितिक नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२८.पुरवठा आदेश दिल्यापासून ८ दिवसाच्या आत पुरवठा सुरु करावा लागेल व नमुद गट/गावापर्यंत पोहच करुन आस्थापित करावा लागेल. या कालावधीत मालाचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीच्या **अर्धा टक्का प्रती आठवडा** या प्रमाणे दंड आकारण्यात येईल व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे राहील.

१. पुरवठा कालावधीत पुरवठा न केलेल्या मालाची किंमत (५.०० लाखार्पेक्षा) कमी असेल तर अशा किंमतीच्या १० टक्के दंड आकारण्यात येईल.

२. पुरवठा कालावधीत पुरवठा न केलेल्या मालाची किंमत (५.०० लाखार्पेक्षा) जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५ टक्के दंड आकारण्यात येईल.

२९. सदर निवेदेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडून मंजूरी मिळाल्यानंतर पुरवठा आदेश देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३०. प्राप्त निविदापैकी कोणतेही निवीदा अंशत: अथवा पूर्णत: स्विकारण्याचे किंवा कोणत्याही कारणे न देता नाकारण्याचे अधिकार या कार्यालयाचे खरेदी समिती यांनी राखून ठेवले आहेत.

३१. LED प्रकारचे सौर पथदिप संच/सयंत्र Supplying,installing,testing and commissioning aoler street light pole comprising of ९ W LED fitting, १२V १८Ah maintenance free lithium battery, min.४० Wp SPV module, MS powder coated battery box weather proof, mounted on ७५/८० mm dia. B-Grade GI pole of ६ m. height along with brackets, foundation,earthing and necessary accessories complete. (with ५ years warrantee) असने आवश्यक आहे.

३२. निविदेतील दर भरतांना वरील सर्व बाबींचा विचार करुन दर नमूद करण्यात यावेत तसेच निविदेतील दर अंकी व अक्षरी असे दोन्ही भरण्यात यावेत.

३३. निविदा विहित नमुन्यात भरावी. इतर प्रकारामध्ये निविदा गृहीत धरली जाणार नाही.

३४.मंजूर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत साहीत्याचा पूरवठा आस्थापित झाल्याची खात्री झाल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतींकडुन मंजूर नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत वस्तू प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.

३५.अपूर्ण सशर्त तसेच अटींची पूर्तता न केलेल्या निवीदा विचारात घेतल्या जाणार नाही.

३६. पुरवठाधारकाकडून या कार्यालयास ज्या वस्तूचा पूरवठा केला जाईल त्याबाबत ग्रा.पं. /लाभ्यार्थाकडून काही तक्रार आल्यास अथवा काही कायदेशिर कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठा धारकाची राहील.

३७.पुरवठा कालावधीत वस्तु/ साहीत्याच्या किंमतीत वाढ झाल्यास वाढीव दराने मागणी पुरवठा धारकास करता येणार नाही.

३८.पुरवठादार यांनी मालाचा संपूर्ण पुरवठा केल्यानंतर व माल नमुन्याप्रमाणे असल्याचे खात्री झाल्यानंतर देयकाची ५० टक्के रक्कम पुरवठाधारकास अदा करण्यात येईल. ४० टक्के रक्कम लाभार्थी सहभागाची रक्कम,ग्रामपंचायतींचा अहवाल व महाऊर्जा कार्यालयाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अदायगी करण्यात येईल. एकुण ९० टक्के रक्कम अदा करताना कार्यादेशातील नमुद एकुण कामांपैकी किमान १० टक्के सौर पथदिप संचांची पहाणी महाऊर्जाच्या संबंधीत कार्यालयामार्फत तपासणी /निरीक्षण करुन प्रमाणित करण्यात येईल. उर्वरित १० टक्के रक्कम ५ वर्षाचा हमी कालावधी यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३९. निवीदा धारकास देयकांचे प्रदान झाल्यानंतर त्यांना दराबाबत काही शंका असल्यास त्यांना एक महिण्याच्या आत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेशी संपर्क साधून शंकेचे निरासन करुन घ्यावे. त्यांनतर त्यांची कुठलीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

४०.वस्तू पुरवठयाबाबत या कार्यालयाकडून वेळीवेळी (आवश्यक त्या वेळेस) जे जे आदेश येतील त्यातील अटी/शर्तीचे पालन करणे पुरवठयाधारकास बंधनकारक राहील.

४१.देयक प्रदानाबाबत तसेच अन्य कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास अथवा निर्णया विरुध्द कार्यवाही करावयाची झाल्यास ती नागपूर जिल्हा सत्र न्यायालयाच्या कार्य कक्षतेच करता येईल.

४२.शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यकता वाटल्यस साहित्याचे नमुन प्रयोगशाळेतून तपासणी करण्यात येईल.

ऑनलाईन ई-निविदा प्रक्रियेबाबत काही तांत्रीक अडचणी (उदा. इंटरनेट कनेक्शन, विज पुरवठा खंडीत होणे, संकेत स्थळावार तांत्रीक अडचणी, बँक व्यवहारातील अडचणी ई.) आल्यामुळे निविदा धारकास यांनी सादर केलेली

कागदपत्र ऑनलाईन अपलोड न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील. याबाबत निविदाधारकाची तक्रार मान्य करता येणार नाही.

४३. **तांत्रीक लिफाफा अ मध्ये दिलेल्या क्रमाने सर्व कागदपत्र अपलोड करावी. अतिरीक्त कागदेपत्र शेवटी अपलोड करावी.**

४४. **तांत्रीक लिफाफातील कागदपत्र सुस्पष्ट व वाचण्यायोग्य असावी.** अन्यथा त्या निविदाधारकाची निविदा रद्द करण्यात येईल.

४५. **निविदा उघडतेवेळी निविदा धारकाने** सादर केलेल्या कागदपत्राच्या मुळ प्रती आणि त्यांची नोटरी केलेली एक प्रत सोबत ठेवावी.

४६. नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या तांत्रिक निकषानुसार सोलर मॉड्युल्स हे आय.ई.सी. (IEC) च्या निकषानुसार व आर.एफ.आय.डी. (RFID) टॅगची सुविधा पुरविणाऱ्या उत्पदकामार्फत आस्थापित करण्यात येणार आहे. तत्सम दर्जा प्राप्त संस्थेकडून संयंत्राचे प्रमाणीकरण केलेले असणे बंधानकारक असेल. त्यानंतरच देयके अदा करण्यात येतील.

४७. उत्पादक/पुरवठादार/कंत्राटदार विद्युत सुरक्षिततेच्या संदर्भातील सर्व कायद्यांचे व नियमांचे जसे भारतीय विद्युत नियमावली २००४ याचे पालन करतील. सदर योजने अंतर्गत पात्र कंत्राटदार/पुरवठादार फिटींगची आस्थापना व इतर संबंधीत कामे महाऊर्जा कार्यालयाकडे नोंदणीकृत पुरवठादाराकडुनच करण्यात येतील.

४८. प्रत्येक फिटींग्जवर उत्पादकाचे नांव, वर्ष, उत्पादनाचा प्रकार, सिरीयल नंबर व दिनांक इत्यादीची माहिती व्यावस्थित नमुद असावी. प्रत्येक फिटिंग्जवर पुरवठादाराने LED प्रकारचे सौर पथदिप (LED Soler Light) फिटिंग्ज बाबतची माहिती, तांत्रिक बाबी, फायदे याबाबतचे माहितीपत्रक प्रत्येक गावी दोन याप्रमाणे वितरीत करण्यात येतील.

४९. उत्पादक/पुरवठा/कंत्राटदार हे फिटींग्जचा पुरवठा, आस्थापना, चाचणी कार्यान्वयन इत्यादी बाबी कार्यादेश दिलेल्या कालावधीतच पुर्ण करतील. असे न केल्यास जिल्हा परिषद संबंधीतास शासनाच्या प्रलचित धोरणानुसार दंड आकारण्याची कार्यवाही करेल.

५०. LED सौर पथदिप संच सुरळीत न चालल्यास पुरवठा/आस्थापना करणाऱ्या पुरवठादाराने होणारी नुकसान भरपाई जिल्हा परिषद, गोंदिया यांना देणे बंधनकारक राहील.

५१. LED प्रकारचे सौर पथदिप संच/संयंत्राचा हमी कालावधी ५ वर्षाचा असावा व सोलर मोड्युलची वॉरंटी १५ वर्षाची असावी.

५२. यशस्वी ई-निविदा धारकांची रक्कम वगळुन इतर ई-निविदा धारकांची अनामत रक्कम परत करण्यात येईल.

५३. स्थानिकस्तरावरील पुरवठाधारकास प्राथमिकता देण्यात येईल.

गोंदिया:-

दिनांक:-

स्वा/-

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद गोंदिया

उपरोक्त अ.क्र १ ते ५३ मध्ये नमूद अटी व शर्ती मी/आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य असुन बंधनकारक राहतील. करिता स्वाक्षरी केली आहे.

गोंदिया:-

दिनांक:-

निविदाधारकाची सही, शिक्का

नांव व पत्ता:-

Annexure "A"

तांत्रिक लिफाफा क्र. अ मध्ये आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबची तपासणी सुची

अ.क्र.	सादर केलेले कागदपत्र	होय/नाही
१	तांत्रिक निविदा फॉर्म (सही व शिक्यासह)	
२	निविदा अर्जाच्या रक्कमेची व बयाणा रक्कमेची (EMD) Online Payment व्दारे भरल्याची पावती	
३	LED प्रकारचे सौर पथदिप संच/सयंत्र उत्पादक किंवा कंपनीचे नोंदणीकृत डिलर्स यांचे महाऊर्जा यांचेकडे नोंदणी असलेले प्रमाणपत्र. (बंधनकारक राहील)	
४	LED प्रकारचे सौर पथदिप संच/सयंत्र उत्पादक किंवा कंपनीचे नोंदणीकृत डिलर्स यांचे नोंदणी असलेले प्रमाणपत्र (उदा. SSI नोंदणी / मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८)	
५	LED प्रकारचे सौर पथदिप संच/सयंत्र डिलरशिप बाबत कंपनीचे प्रमाणपत्र (LED Street Light Transplanter Dealarship)	
६	G.S.T. कर नोंदणी प्रमाणपत्र	
७	G.S.T. कर निपटारा प्रमाणपत्र माहे- नोव्हेंबर, २०१९ अखरेचे अथवा निविदेच्या दिनांक पर्यंत वैध असलेले.	
८	पॅन कार्ड प्रत	
९	सन २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ अखेरचे आयकर विविरणपत्र	
१०	मागील तीन वर्षाचे सनदी लेखापाल यांचे लेखा परीक्षण अहवाल २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९	
११	जर निविदाधारक भागीदारी संस्था किंवा कंपणी किंवा सहकारी संस्था असले तर त्या बाबतचे नोंदणी प्रमाणपत्र /भागीदारी करार/संस्थेच्या घटनेची प्रत जोडणे आवश्यक आहे. केवळ या निविदेसाठी संयुक्त भागीदारी (Joiny Venture) केल्यास सदर निविदा अमान्य करण्यात येईल.	
११	निविदाधारकाने रु. १००/- च्या न्यायालयीन मुद्रांकावर सदर संस्था/ निविदाधारक केंद्रशासन अथवा राज्यशासन यांचे कडून कधीही काळया यादीत टाकण्यात आली नाही. तसेच सदर संस्था / निविदाधारक यांचे वर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.	
१२	जे निविदा धारक व्यापारी संस्था असतील त्यांनी संबधित उत्पादकांचे प्राधिकार पत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच LED प्रकारचे सौर पथदिप सयंत्राची कंपनी याचा यात समावेश असावा.	
१३	LED प्रकारचे सौर पथदिप सयंत्र निर्मीत कंपनी भारतीय असणे अनिवार्य आहे. तसेच निर्मीत कंपनीजवळ अधिकृत भारतीय उत्पादन परवाना असणे आवश्यक आहे. (Manufacturer Should have authoried munafacturing Licence of India)	
१४	मागील ३ वर्षाचे ताळेबंद (Balance sheet) जोडणे आवश्यक आहे. (टेंडर धारकाची वार्षिक उलाढाल ही २५ लक्ष पर्यंत असावी)	

Annexure "B"

निविदेचा तपशिल

अ.क्र.	पुरवठा करावयाचा वस्तुचा तपशिल	निविदा फॉर्मची किंमत (नापरतावा)	अनामत रक्कम	निविदेची अंदाजित रक्कम
१	LED प्रकारचे सौर पथदिप संच/सयंत्र Supplying,installing,testing and commissioning aoler street light pole comprising of 9 W LED fitting, 12V 18Ah maintenance free lithium battery, min.40 Wp SPV module, MS powder coated battery box weather proof, mounted on 75/80 mm dia. B-Grade GI pole of 6 m. height along with brackets, foundation,earthing and necessary accessories complete. (with 5 years warrantee)	रुपये- १०००/-	रु. ५०००/-	रु. २१,१८८/-

दरपत्रक लिफाफा (ब)

पुरवठा धारकांनी सादर करावयाचे दरपत्रक

अ.क्र.	पुरवठा/आस्थापित करावयाचा साहित्याचे नांव	पुरवठा करावयाच्या वस्तुचा तपशिल	परिणाम	पुरवठयांची एकुण किंमत	आवश्यक पुरवठा संख्या	एकुण रक्कम
१	LED प्रकारचे सौर पथदिप संच/सयंत्र	Supplying,installing,testing and commissioning aoler street light pole comprising of 9 W LED fitting, 12V 18Ah maintenance free lithium battery, min.40 Wp SPV module, MS powder coated battery box weather proof, mounted on 75/80 mm dia. B-Grade GI pole of 6 m. height along with brackets, foundation,earthing and necessary accessories complete. (with 5 years warrantee)	Nos.	२१,१८८/-	१	२१,१८८/-

(टिप – निविदाधारकाने मागण्यात आलेले दर हे सर्व कर, हमाली, वाहतूक,पुरवठा, आस्थापित इ. बाबी समाविष्ठ सह सादर करावे. नमुद केलेल्या दराव्यतिरीक्त कोणताही खर्च निविदाधारकास देण्यात येणार नाही.)